केंद्र शासनाच्या आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आदर्श आमदार ग्राम योजना राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय, क्रमांकः आग्रायो-२०१५/प्र.क्र.३६/योजना-५**

२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड,

फोर्ट, मुंबई-४०० ००१.

दिनांक : २० मे, २०१५

**वाचा :**

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०१४/प्र.क्र.१८३ पंरा.३, दिनांक ३१ डिसेंबर, २०१४.**

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाने आदर्श गाव साकारण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१४ रोजी सांसद आदर्श ग्राम योजना लागू केली आहे. सांसद आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यातील विधानमंडळ सदस्यांनी देखील ग्राम पंचायतींना आदर्श ग्राम करण्यासाठी आमदार आदर्श ग्राम योजना राज्यात राबविण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या सांसद आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आमदार आदर्श ग्राम योजना राबविण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

२. **आमदार आदर्श ग्राम योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :**

**१) सर्वसाधारण :**

अ) या योजनेची अंमलबजावणी सर्वसाधारणपणे सांसद आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवरच करण्यात येईल.

ब) प्रत्येक आमदार त्यांच्या मतदार संघातून जुलै, २०१९ पर्यंत तीन ग्रामपंचायती आदर्श ग्राम म्हणून विकसित करतील.

**२) ग्रामपंचायत निवडीचे निकष :**

अ) निवडण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या किमान १००० असावी.

ब) आमदारांना आपले स्वत:चे वा आपल्या पतीचे/पत्नीचे गाव निवडता येणार नाही

क) विधानसभा सदस्यांचा मतदार संघ जर शहरी आणि ग्रामीण भागात विभागला गेला असेल तर ते मतदार संघाच्या ग्रामीण भागातून ग्रामपंचायतीची निवड करतील.

ड) विधानसभा सदस्यांचा मतदार संघ जर संपूर्णपणे शहरी असेल तर त्यांच्या सोयीच्या दृष्टीने त्याच जिल्ह्यातील एका ग्रामपंचायतीची निवड करु शकतील

इ) मुंबई परिसरातील शहरी मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा सदस्य राज्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीची निवड करु शकतील
ई) विधानपरिषद सदस्य त्यांच्या इच्छेप्रमाणे कोणत्याही जिल्ह्यातून ग्रामपंचायतीची निवड करु शकतील.

**३) गावांचा सर्वांगीण विकास :**

या योजनेत केंद्र व राज्य शासनाच्या अस्तित्वात असलेल्या विविध योजनांच्या कृतिसंगमाद्वारे (convergence) अंमलबजावणी करण्यात येईल. याबाबतचे दर्शक उपक्रम परिशिष्ट-१ मध्ये नमूद केले आहेत.

**४) आमदार निधी :**

निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये आमदार निधीतून घेण्यात येणाऱ्या अनुज्ञेय असलेल्या कामासाठी राज्य शासनाकडून जोड निधी देण्यात येईल. याबाबत मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

**५) संकेतस्थळ :**

भारत सरकारच्या www.saanjhi.gov.in या संकेतस्थळाच्या धर्तीवर आमदार आदर्श योजनेच्या प्रभावी संनियंत्रणासाठी राज्य स्तरावर वेब पोर्टलची निर्मिती करण्यात येईल.

**६) समन्वय :**

राज्यात या योजनेच्या अंमलबजावणीकरीता “ग्राम विकास विभाग” समन्वय विभाग राहील.

**७) प्रशासकीय खर्च :**

योजनेच्या व्यवस्थापनाकरीता येणारा प्रशासकीय खर्च ग्राम विकास विभागाच्या राज्य योजनेतंर्गत उपलब्ध नियतव्ययामधून जास्तीत जास्त ०.५% मर्यादेमध्ये भागविण्यात येईल.

३. या योजनेअंतर्गत अंमलबजावणी बाबी संदर्भात मार्गदर्शक सुचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५२०१६२१४१५३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2015.05.21 11:08:57 +05'30'

सोबत: परिशिष्ट-१

**(वि.गिरिराज)**
प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.राज्यमंत्री (सर्व) , महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व) , महाराष्ट्र राज्य,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव/ सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
७. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर, (दोन प्रती)
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर, (दोन प्रती)
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. जिल्हाधिकारी (सर्व)
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
१२. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई (सर्व कार्यासन)
१३. निवडनस्ती (कार्यासन, योजना-५)

## परिशिष्ट- १

| अ.क्र. | दर्शक उपक्रम |
|---|---|
| १ | ग्रामस्थांमध्येउत्तम आरोग्यासाठी स्वच्छतेच्या सवयी विकसित करणे, बालके व महिलांमधील कुपोषणा विषयी जाणीव जागृती निर्माण करणे. |
| २ | गावकऱ्यांमध्ये व्यसनांचे दुष्परिणाम (दारु, तंबाखू इ सेवन) याबाबत जागृती करुन सुदृढ आरोग्याच्यासवयी विकसित करणे. |
| ३ | सर्वांना किमान इयत्ता दहावी पर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे. |
| ४ | सामाजिक एकोपा व शांतताप्रिय सहजीवन असणारे ग्रामीण वातावरण तयार होण्यासाठी गावातील गुन्हेगारी, बेकारी, लिंग भेदभाव इ.दूर करुन युवक व स्वयंसहाय्यता समुहांचे ग्रामविकासात योगदान घेणे. |
| ५ | गावाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शेती संबंधातील सेवांचा दर्जा उंचावणे, पशुसंवर्धन, पाणलोट विकास, लघु-ग्रामोद्योग व बँक क्षेत्रातील विविध सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणे. |
| ६ | युवकांना कौशल्यवृध्दी प्रशिक्षणे देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणे. युवकांमध्ये ग्रामीण विकासासाठी संघटनात्मक कौशल्याची वृध्दी करणे. |
| ७ | गावामध्ये सुसज्ज ग्रामपंचायत भवन,उत्तम दर्जाचे रस्ते, पुर्णवेळ वीज, अन्य सार्वजनिक सेवा-सुविधा, इंटरनेट सुविधा इ.पायाभूत सुविधा विकसित करणे. |
| ८ | गावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष लागवड, सार्वजनिक धन कचऱ्याचे व्यवस्थापन तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन व संवर्धन करणे. |
| ९ | निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता विषयक विविध कार्यक्रम जसे घनकचरा विल्हेवाट, सेंद्रीय कचऱ्याचे कंपोस्टिंग करुन खत वापरण्याची योजना इत्यादी कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात येतील. |
| १० | सदर ग्रामपंचायतीत सांड पाण्यावर प्रक्रिया करुन तयार होणारे शुध्द पाण्याचा फेरवापर शेतीसाठी करण्यात येईल. |